CMYK

सुविचार

संकटांचा सामना आत्मविश्वासाने करा, यश आपलेच आहे.

# दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com



पाचही मंडळात जोरदार पाऊस

पेज ४

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 112 ■ रविवार दि. 1 जून 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5

# पोलिस ॲक्शन मोडवर; गांजा जप्त, ३६ गावठी दारू अड्डे उध्वस्त

## एसपींच्या नेतृत्वात धडाकेबाज कारवाया

आरंभ मराठी | धाराशिव



धाराशिवच्या पोलीस अधीक्षक रितू खोखर यांनी पोलीस अधीक्षक म्हणून कार्यभार हाती घेताच धाराशिव जिल्ह्यात अंमली पदार्थ आणि गावठी दारू विरोधात मोहीम हाती घेतल्याचे दिसत आहे. मागील चार दिवसात अवैध गांजा सेवन आणि विक्री विरोधात चार मोठ्या कारवाया केल्या आहेत. तर गावठी दारू विरोधातही वेगवेगळ्या भागात ३६ छापे टाकले आहेत. पोलीस अधीक्षक यांनी सुरू केलेल्या धडक कारवाईचे नागरिक स्वागत करत असले तरी या कारवाईमध्ये सातत्य राहील का असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे.धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर शहरातील ड्रग्ज प्रकरणामुळे मागील साडेतीन महिन्यात बऱ्याच घडामोडी घडल्या आहेत. ड्रग्ज प्रकरणातील तपासवरून देखील पोलिसांच्या भूमिकेवर वारंवार संशय व्यक्त केला आहे.।पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी वेळोवेळी सूचना करूनही ड्रग्ज प्रकरणातील निम्मे आरोपी अजूनही फरार आहेत. ड्रग्ज प्रकरणावरून टीकेचे लक्ष होत असल्यामुळे पोलीस अधीक्षक संजय जाधव यांची तातडीने नऊ महिन्यातच बदली केल्याचे बोलले जात आहे. सांगली येथे अपर पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत असलेल्या रितू खोखर यांना धाराशिवच्या पोलीस अधीक्षक म्हणून कार्यभार दिला आहे. खोखर यांच्यासमोर तुळजापूर ड्रग्ज प्रकरणाचा छडा लावण्याचे प्रमुख आव्हान असल्यामुळे त्यांनी रुजू होताच जिल्ह्यातील अंमली पदार्थांच्या विरोधात धडक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच त्यांनी गावठी दारूच्या विरोधात देखील कारवाईचा धडाका लावल्याचे दिसत आहे. धाराशिव जिल्ह्यात गांजा या अंमली पदार्थाच्या विरोधात इतक्या मोठ्या प्रमाणावर कारवाया झाल्याची ही पहिलीच वेळ असल्याचे बोलले जात आहे. मागील चार दिवसात गांजा विरोधात चार मोठ्या कारवाया करण्यात आल्या आहेत. यामध्ये लाखो रुपये किंमतीचा जवळपास दहा किलो गांजा जप्त करण्यात आला आहे. तसेच अवैध मद्य विरोधी ३६ छापे टाकण्यात आले आहेत. यामध्ये ६७७ लिटर गावठी दारू जप्त करून नष्ट करण्यात आली आहे. या दारूची किंमती १ लाख ७८ हजार रुपये आहे. अंमली पदार्थांच्या विरोधातील मोहिमेत शुक्रवारी धाराशिव शहरातून देखील अडीच किलो गांजा जप्त केल्यामुळे जिल्ह्यातील फक्त ग्रामीण भागातच नाही तर शहरी भागात देखील अंमली पदार्थाचे जाळे पसरले असल्याचे स्पष्ट झाले आहे. पोलीस अधीक्षक यांच्या या धडक कारवाईचे नागरिकांतून स्वागत केले जात असले तरी या कारवाईत सातत्य राहिले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



## अंमली पदार्थाच्या विरोधातील धडक कारवाया

धाराशिव शहर पोलीस ठाण्याचे शकील शेख यांना मिळालेल्या गोपनीय माहिती आधारे शहरातील भोसले हायस्कलुसमोरील थोरात इलेक्ट्रॉनिक्स दुकानामागे घरात छापा टाकला असता, त्या घरात ठेवलेला २.५० कि. ग्रॅ. वजनाचा गांजा जप्त केला. यावेळी कुणाल अनिल पवार (वय ३० वर्षे) व त्याच ठिकाणी अंमली पदार्थाचे सेवन करताना जिशान अली साहेब अली (वय ३५ वर्षे, रा. बेंबळी), विपुल दिपक खोब्रे (वय ३० वर्षे रा. कोट गल्ली धाराशिव), शाहरुख दावल मुजावर (वय २९ वर्षे, रा. शिंगोली ता. जि. धाराशिव), ओमकार दिलीप शिंदे (वय २९ वर्षे, रा. कोट गल्ली धाराशिव) यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलीसांनी ४१००० रुपये किंमतीचा २.५० कि.ग्रॅ गांजा तसेच गांजा विक्रीतुन मिळालेले ६,००० रुपये असा एकुण ४७,२०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. आरोपींविरोधात धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुरनं २७१/२०२५ एन डी पी एस कायदा कलम ८(),२०()()(),२७ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## गांजाचे सेवन करणारा तरुण ताब्यात

अवैधपणे गांजाचे सेवन करणाऱ्या तरुणाला कळंब पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याच्यावर कारवाई केली. आरोपी कुणाल मनोहर माने (वय २३ वर्षे, रा. इंदीरानगर, कळंब) याला दिनांक २८ मे रोजी सायंकाळी इंदीरानगर कळंब येथे गांजा ओढत असताना कळंब पोलीसांनी ताब्यात घेतले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन त्याच्याविरुध्द एन.डी.पी.एस अफक्ट १९८५ कलम ८ (सी), २७ अन्वये कळंब पो.ठा. येथे गुन्हा नोंदवण्यात आला असून, प्रत्येक भागात कारवाया सुरू झाल्या आहेत.या कारवायांमुळे पोलिसांचे कौतुक होत आहे.

## गांजाचे सेवन करून विक्री करणाऱ्या नऊ जणांवर पोलिसांची कारवाई

गांजाचे अवैधपणे सेवन करून त्याची विक्री करणाऱ्या नऊ जणांविरुद्ध परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परंडा आणि आसपासच्या गावातील नऊ आरोपी दिनांक २७ मे रोजी दुपारी दीड वाजता परंडा येथील सरकारी दवाखान्याच्या समोरील एका पत्र्याच्या शेडमागे ९६७ ग्रॅम वजनाचा अंदाजे २०,००० रुपये किंमतीच्या गांजाचे सेवन करत होते. पोलीसांनी गांजा जप्त करून नऊ व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल केला.

## लाखनगाव येथून सात किलो गांजा जप्त

वाशी तालुक्यातील लाखनगाव येथे अवैध गांजा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर व्यक्तीला ताब्यात घेऊन त्याच्याकडील दीड लाख रुपये किंमतीचा सात किलो गांजा जप्त केला. आरोपी फुलचंद साहेबा शिंदे (रा. लाखनगाव ता. वाशी जि. धाराशिव) हे दिनांक २९ मे रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास आपल्या राहत्या घरात ७.०१० कि. ग्रॅम वजनाचा अंदाजे १,४०,२०० रुपये किंमतीचा गांजा विनापरवाना विक्री करीता जवळ बाळगलेला वाशी पोलीसांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी अंमली पदार्थ जप्त करून त्याच्याविरुद्ध गुंगीकारक औषधी द्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे अधिनियम १९८५ कलम– ८ (क), २० (ब) अन्वये वाशी पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे. पोलिसांच्या वाढलेल्या कारवायांमुळे अवैध व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

# लोकसहभागातून आहिल्यादेवींचा भव्य पुतळा

## तुळजापूरमध्ये आ.राणाजगजितसिंह पाटील यांच्याकडून देणगी

आरंभ मराठी | धाराशिव

राजमाता आहिल्यादेवी होळकर यांनी स्वतःच्या कर्तृत्वाने अभिमानास्पद आणि प्रेरणादायी आलेख कोरला आहे. आहिल्यादेवी या खऱ्या अर्थाने स्त्री सक्षमीकरणाचे अमूल्य असे प्रेरणास्थान आहेत. तुळजापूरमध्ये पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे भव्य स्मारक साकारण्यात येणार आहे. हे केवळ स्मारक नसून त्याठिकाणी अद्ययावत प्रेरणा केंद्र आणि मदत केंद्रही उभारण्याची योजना असल्याचे सांगत लोकसहभागातून पुतळा उभारणीसाठी निधी संकलनाची सुरुवात म्हणून आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी शनिवारी एक लाख रुपयांचा सक्रिय सहभाग दिला.पुण्यश्लोक राजमातांच्या भव्य स्मारकासाठी एक कोटी रुपयांचा निधी यापूर्वीच उपलब्ध झाला आहे. त्यातूनच हे भव्य स्मारक उभारण्यात येणार आहे. या स्मारकात केवळ पुतळाच नव्हे, तर प्रेरणा केंद्र आणि मदत केंद्रही उभारण्याची योजना आहे. यासाठी सर्वांनी सक्रिय सहभाग देण्याचे आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले. पुतळा हा लोकसहभागातून उभा करण्याचा निर्धार करण्यात आला व लोकसहभागातून निधी संकलनही सुरू करण्यात आले. प्रारंभी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी स्वतः १ लाख रूपयांचा निधी देत या लोकसहभाग कार्याचा शुभारंभ केला. अठराव्या शतकात स्त्रियांना सामाजिक बंधनांत अडकवले गेले असताना, पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांनी स्त्री सक्षमीकरणाचे उदात्त कार्य उभारले. त्यांनी सुरू केलेल्या महेश्वरी साडी उद्योगाने महिलांना केवळ आर्थिक स्वावलंबनच दिले नाही, तर स्वाभिमान व आत्मसन्मानाचे भानही दिले. महेश्वर येथे कुशल विणकरांना बोलावून, स्थानिक महिलांना प्रशिक्षण देत त्यांनी समाजात क्रांतिकारी बदल घडवून आणला असल्याचेही आमदार पाटील यांनी यावेळी सांगितले.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी तुळजापूर येथील छत्रपती संभाजी महाराज उद्यानाशेजारी भव्य स्मारक उभारण्यात येत आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये या स्मारकाचे भूमिपूजन झाले व कामास सुरुवात झाली आहे.जयंतीच्या औचित्य साधत त्या कामाची आमदार पाटील पाहणी देखील केली.

## तुळजापूर ड्रग्ज प्रकरणातील आरोपी विनोद गंगणे याना जामीन मंजूर

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर ड्रग्ज प्रकरणात सेवन गटातील विनोद गंगणे यांना जिल्हा न्यायालयाने अखेर जामीन मंजूर केला असून त्यांना पुढील सुनावणी पर्यंत तात्पुरता जामीन मंजूर करण्यात आला आहे. या प्रकरणातील हा पहिला जामीन असून यामुळे विनोद गंगणे यांना मोठा दिलासा मिळाला आहे.राज्यभर चर्चा झालेल्या



तुळजापूर ड्रग्ज प्रकरणात एकूण ३७ संशयित आरोप निष्पन्न झाले आहेत. यामधील एक असलेले विनोद गंगणे यांच्यावर ड्रग्स सेवन केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे. २५ मार्च रोजी पोलिसांनी कोर्टात दिलेल्या यादीत त्यांचे नाव समाविष्ट होते तेव्हापासून ते फरार होते. अखेर जामीन मिळाल्यामुळे त्यांना दिलासा मिळाला आहे.

# 'तेरणा'त १० टक्के पाणीसाठा वाढला

## धरणात ४१ टक्के पाणीसाठा; धाराशिव तालुक्यात १२ दिवसांत २५४.६ मिलिमीटर पावसाची नोंद



सुभाष कुलकर्णी | आरंभ मराठी

तेर –धाराशिव तालुक्यात गेल्या १२ दिवसापासून सुरू असलेल्या मान्सूनपूर्व पावसाने तेरणा मध्यम प्रकल्पात प्रथमच मे महिन्यात प्रकल्पाच्या पाणीसाठ्यात वाढ झाली असून, धरणातील पाणीसाठा ३१ टक्क्यांवरून ४१ टक्केपर्यंत पोहोचला आहे.

धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील तेर, ढोकी महसूल मंडळात पडलेल्या पावसामुळे तेरणात पाणीसाठा वाढला आहे.धाराशिव तालुक्यातील महसूल मंडळात साधारण १० ते १२ दिवस पाऊस पडला. धाराशिव तालुक्याची मे महिन्याची पावसाची सरासरी २१.४ मि.मी.आहे. मात्र प्रत्यक्षात २५४.६ मि.मी.पाऊस पडला. सरासरीच्या ११८९.७ टक्के पाऊस पडला आहे. त्यामुळे तेरणा मध्यम प्रकल्पाच्या जलाशयात १० टक्के पाणीसाठा वाढला आहे.तेरणा मध्यम प्रकल्पाची एकुण क्षमता २०.५५४ द.ल.घ.मी असून मृत पाणीसाठा क्षमता ०.८९६ द.ल.घ.मी आहे धरणाचा उपयुक्त पाणीसाठा १९.६३ दलघमी आहे. टक्केवारीत शनिवार दि.३१ में रोजी ४०.४२ टक्के पाणी आहे. प्रकल्पाचे उजवा व डावा हे दोन्ही कालवे दुरुस्त करण्यात आले असल्याने १६५२ हेक्टर क्षेत्र ओलीताखाली येणार आहे. या मध्यमातूनशेतीसाठी मुबलक पाणी उपलब्ध झाले आहे.

### धाराशिव तालुक्यातील महसूल मंडळात पडलेला पाऊस

| | |
|---|---|
| धाराशिव शहर | २७७.६मि.मी |
| धाराशिव ग्रामीण | ३३२.०मि.मी |
| बेंबळी | २४६.०मि.मी |
| पाडोळी आ. | २५७.६ मि.मी |
| केशेगाव. | २४२.०मि.मी |
| ढोकी. | २०३.७मि.मी |
| जागजी. | २५८.१मि.मी |
| तेर. | २१४.९मि.मी |


### दहा टक्के पाणीसाठा वाढला

मे महिन्यात पडलेल्या पावसामुळे तेरणा प्रकल्पात पहिल्यांदाच १० टक्के पाणीसाठा जमा झाला. सध्या धरणात ४१ टक्के पाणीसाठा असून, शनिवारी सकाळी १.५० द.ल.घ.मी.पाण्याची आवक सुरू झाली आहे.

–धनंजय वरपे
शाखा अभियंता, तेरणा प्रकल्प.

## पाणीसाठा आणखी वाढण्याची शक्यता

तेरणा प्रकल्पात दहा टक्के पाणीसाठा वाढला असला तरी पुढच्या आठवड्यात यात आणखी वाढ होणार आहे. मागील दोन दिवसात देखील शिवारात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे धरणात आवक मोठ्या प्रमाणात सुरू आहे. त्यातच मोठे पाऊस झाल्यामुळे उपसा सुरू नाही. त्यामुळे पाणीसाठा पन्नास टक्क्यांपर्यंत जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यंदा प्रथमच प्रकल्पात पावसाळ्याच्या सुरुवातीलाच इतक्या मोठ्या प्रमाणात पाणीसाठा उपलब्ध आहे. जून महिन्यात पावसाने चांगली हजेरी लावली तर प्रकल्प यंदा लवकरच ओसंडून वाहू लागेल.




CMYK

CMYK

02

www.arambhmarathi.com


दैनिक आरंभ मराठी

संपादकीय

रविवार दि.1 जून 2025

# वचन प्रकटनाचा रोमहर्षक इतिहास

लिंगायत धर्माचे संस्थापक जगत्जोती बसवण्णा यांच्यासह अनेक शरणांचे वचनसाहित्य सुप्रसिद्ध आहे.मूळ कन्नड भाषेतले हे विचारसंचित आता भारतातील आणि जगभरातील प्रमुख भाषांत सहजपणे उपलब्ध आहे. लिंगायत धर्मावलंबी शरणांनी आपल्या समतावादी विचारांच्या प्रसारार्थ एकेकाळी स्वतःचे बलिदानसुद्धा दिल्याचा इतिहास आहे.शोषणवादी धर्ममार्तंडांनी सर्वसमावेशक,समतावादी धर्माला कायमच विरोध केला आहे.जाती,वर्ण,धर्म अशा कृत्रीम भेदांना न जुमानता सकल मानवकल्याणाचा आग्रह धरणाऱ्या लिंगायत शरणांवर प्राणघातक हल्ले झाले आहेत,इतकेच नव्हे तर मोठा नरसंहारसुद्धा घडला आहे.प्राचीन काळापासून वैदिकांनी आपल्या विचारविरोधकांना संपविण्यासाठी हिंसेचा मार्ग अवलंबला.भारतातला बौद्ध धम्म संपविण्यासाठी जे हिंसक तंत्र अवलंबले गेले तेच पुन्हा लिंगायतधर्माच्या विरोधात वापरले गेले.परंतू अशा सर्व क्रूर कारवायांना न जुमानता शरणसाहित्याचे जतन सर्वसामान्य जनतेकडून झाल्याचे दिसून येते.ताडपत्रांवर लिहिले गेलेले वचनसाहित्य शोधण्यापासून ते कागदावर मुद्रित होईपर्यंतचा प्रवास अतिशय रोमहर्षक आहे.त्यासाठी अनेकांचा हातभार लागला आहे. त्याच वचन प्रकटनाचा इतिहास सलगपणे लोकांपुढे कन्नडभाषेमधून ठेवण्यात आला,त्याच इतिहासाला मराठी वाचकांपुढे आणण्याचा संकल्प भालकीस्थित हिरेमठ संस्थानाने केला आहे.मठाधिपती डॉ.बसवलिंग पट्टदेवरु यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त हा इतिहास मराठीजनांसाठी उपलब्ध झाला आहे. ज्याचा कन्नडमधून मराठी अनुवाद लिंगायत धर्म आणि शरणसाहित्याचे अभ्यासक राजू जुबरे यांनी केला आहे.प्रस्तुत पाचव्या भागात,( वचन प्रकटन इतिहास ) पाच लेखांचे संकलन आहे.वचन पितामह म्हणून गौरविण्यात आलेले डॉ.फ. गु.हळकट्टी आणि शहिद डॉ.एम.एम. कलबुर्गी यांनी वचनसाहित्याच्या संकलन,प्रकटन आणि प्रसार,प्रचार यासाठी आपले उभे आयुष्य वेचले आहे. शरणांच्या वचनसाहित्यामुळेच कन्नडभाषेला साहित्याच्या दृष्टीने भारतीय आणि जागतिक महत्त्व प्राप्त झाले असल्याचे स्पष्ट प्रतिपादन पुस्तकाच्या पहिल्या लेखात डॉ.बी. व्ही.मल्लापूर यांनी केले आहे. तत्पूर्वी आपल्या मनोगतातून राजू जुबरे यांनी वचनसाहित्याचा संक्षिप्त इतिहास नमूद केला आहे'बाराव्या शतकात बसवादी शरणांनी रचलेले हे वचनसाहित्य परिवर्तनवादी साहित्य होते.मानवतावादी मूल्ये आचरणात आणून शरणांनी समग्र क्रांती घडवून आणली.ही क्रांती तत्कालिन प्रतिगामी व्यवस्थेच्या पचनी पडली नाही. म्हणून त्यांनी शरणांच्या हत्याकांड घडवून आणण्याबरोबरच,त्यांनी रचलेले वचनसाहित्य नष्ट करण्याचा प्रयत्न केला.तेव्हा आपल्या प्राणांचीही पर्वा न तकरता शरणांनी वचनसाहित्याचे रक्षण केले.त्याचाच हा कल्याण ते उळवीपर्यंतचा खडतर प्रवास रोमांचकारी आहे'१८८९ साली 'बसवण्णांची षट्स्थल वचने' ही वचनकृती पहिल्यांदा मुद्रित झाली.या ऐतिहासिक घटनेस शंभरवर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने कर्नाटकातील गदग येथील जगद्गुरु तोंटदार्य मठात 'वचन साहित्य प्रकटनाचा इतिहास' असा परिसंवाद ९ एप्रिल १९९० रोजी आयोजित करण्यात आला होता.या परिसंवादाचे




अध्यक्षपद डॉ.एम.एम.कलबुर्गी यांनी भूषविले होते.या परिसंवादातील वक्त्यांची मांडणी कन्नडमध्ये प्रसिद्ध झाली होती.त्याचाच मराठी अनुवाद महाराष्ट्र बसव परिषदेच्यावतीने प्रकाशित झाला आहे.भारतामध्ये ख्रिस्ती धर्मप्रसारकांनीच पहिल्यांदा छपाईचे तंत्रज्ञान वापरले होते. साहजिकच ख्रिस्ती धर्मप्रसारासाठी त्याचा प्राधान्याने वापर केला गेला. ंगळुरु येथील ख्रिश्चन मोग्लिंग यांनीच पहिल्यांदा कन्नडभाषेतील प्राचीन कृती मुद्रित केल्याचा इतिहास आहे. वीरशैव साहित्याची छपाई करण्याचे श्रेयही मोग्लिंग यांनाच जाते.भीम कवीचे बसवपुराण,विरुपाक्ष पंडिताचे चेन्नबसव पुराण १८५० साली प्रसिद्ध केले गेले.फ.गु.हळकट्टी यांनी १९१८ साली वचनशास्त्रसार भाग-१ हा स्वतः संपादित केलेला ग्रंथ बासेल मिशन प्रेसला पाठविला होता.परंतू या कृतीत ख्रिस्ती धर्माची तत्त्वे आणि नीतीच प्रतिपादित केलेली असल्युाळे याचे प्रकटन ख्रिस्तीधर्मप्रसारास बाधा आणू शकेल'अशा आशयाचे पत्र दिले होते.यावरुन हे लक्षात येते की ब्रिटीश साम्राज्यवाद्यांनाही वचनसाहित्याचे महत्त्व उमगले होते पण ख्रिस्तीधर्मप्रसाराच्या ध्येयाने पछाडलेले मिशनरी कन्नड वचनसाहित्य सामान्य लोकांपुढे आणण्यास अनुच्छुक होते.पुढील काळात वचन पितामह हळकट्टी यांनी विजापूर,बेळगाव जिल्ह्यातील शेकडो गावातील घरोघरी जाऊन वचने रचलेली ताडपत्रे गोळा केली. त्याचीच पुढे संकलने प्रसिद्ध केली. हळकट्टी यांचे समकालीन चेन्नमल्लिकार्जून यांचेही वचन साहित्य प्रकटन कार्यातले योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते,अध्यापक,प्रवचनकार म्हणून गावोगावी संचार असल्यामुळे शरणसाहित्य संकलनाचे महाकार्य तडीस जाऊ शकले.अशा थोर व्यक्तींनी या कार्यास हात घातला नसता तर शरणांचे वचनसाहित्य आजही अंधारातच राहिले असते. डॉ.बी.व्ही.मल्लापूर,डॉ.बी. आर.हिरेमठ,डॉ.बी.व्ही.शिरुर, प्रा.आर.राचप्पा यांनी अतिशय अभ्यासपूर्ण पद्धतीने वचन प्रकटन,संकलन आणि मुद्रणाचा समग्र इतिहास विशद केला आहे. त्यातून वचनसंकलकांचा प्रचंड संघर्ष आणि त्यांची कायकवृत्ती पाहावयास मिळते.सकल मानवजातीचे हित चिंतणारी शरणविचारधारा वचनसाहित्यामुळे अमर झाली आहे.शोषणशाहीला थेट विरोध करणाऱ्या शरण परंपरेला दडपण्याचा अथक प्रयत्न झाला तरी सर्वसामान्य जनतेच्या प्रचंड पाठबळामुळे शरणपरंपरा प्रतिगामी व्यवस्थेला पुरुन उरली. बसवण्णा,अल्लमप्रभु,योगिनी अक्कमहादेवी,शिवयोगी सिद्धाराम या प्रमुख शरणांमुळे लिंगायत धर्माची तत्त्वे समाजाच्या तळागाळात जाऊन पोहोचली.लोककल्याणाचा सहज,सोपा विचार आणि मार्ग सांगणारे वचनसाहित्य नष्ट करण्याचा अतोनात प्रयत्न झाला.तो यशस्वी होऊ न शकल्याने वचनांचा विपर्यास करुन ते दूषित करण्याचाही आटापिटा केला.पण वचन साहित्य संकलन करणाऱ्या थोर ध्येयवाद्यांनी सर्व अडचणी पार करुन,प्रस्थापित अन्यायी धार्मिक,सामाजिक व्यवस्थेला न जुमानता शरणांच्या वचनसाहित्याचा अनमोल खजिना सामान्यांसाठी खुला केला,या थोर कार्याबद्दल त्यांचे आपण सदैव ऋणी राहिले पाहिजे.त्यांच्याविषयी कृतज्ञ असायला हवे.वचन पितामह हळकट्टी यांनी विजापूरातून सुरु केलेल्या शिवानुभव ग्रंथमालेचे वचन प्रकटनाच्या इतिहासात आगळे वेगळे महत्व आहे.संशोधनापूर्वी फक्त साठ वचनकारच ज्ञात होते पण हळकट्टी यांनी तीनशेच्यावर वचनकार प्रकाशात आणले.१९६१ ते १९८० या कालखंडात वचन साहित्याचे प्रकटन व संपादनाचे उपक्रम संपूर्ण कर्नाटकभर चालले.विद्यापीठीय स्तरावर कन्नड अध्ययन पीठाद्वारे वचन साहित्य प्रकटन योजना चांगलीच यशस्वी ठरली.म्हणूनच कलबुर्गी सर या कालखंडाला वचन संपादनाच्या सुगीचा काळ मानतात.या काळात सुमारे ऐंशी वचनग्रंथ प्रकाशित झाले.गदग येथील परिसंवादाच्या अध्यक्षीय भाषणामधून डॉ.एम.एम. कलबुर्गी यांनी या आयोजनाची धुरा सांभाळणाऱ्या तोंटदार्य संस्थान मठ,गदग यांचा मुक्तकंठाने गौरव केला होता.'धर्माचे खरे प्रयोजन हे विचार उन्नत करणे असते' जे या संस्थानाकडून निरलसपणे सुरु आहे. वचनसाहित्याचे संपादन,परिष्करणाचे कार्य यापुढील काळातही पुढील पिढ्यांनी करतच राहिले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करतानाच अखिल मानवजातीसाठी उपयुक्त असलेल्या वचनसाहित्याचे जतन,अनुकरण करण्याचेही आवाहन डॉ.कलबुर्गी यांनी यावेळी केले होते.शरणांच्या वचन संकलन,प्रकटनाचा इतिहास प्रदीर्घ असून अशा पुस्तकांमधून त्या थोर कार्याची तोंडओळख होण्यास निश्चितपणे मदत होते.आजवर अज्ञात राहिलेला हा वचनसाहित्याचा इतिहास टप्याटप्याने कन्नड आणि मराठी भाषेतही उपलब्ध होत आहे ही अतिशय समाधानाची बाब आहे.त्यासाठी भालकीच्या 'हिरेमठ संस्थान'चे आभार.






भरत यादव
9890140500

पुस्तकाचे नावः वचन प्रकटन इतिहास,मराठी अनुवाद राजू ब.जुबरे, प्रकाशकः हिरेमठ संस्थान ट्रस्ट,महाराष्ट्र बसव परिषद,भालकी. पृष्ठसंख्याः ५६

# कोई लौटा दे मेरे, बीते हुए दिन !

१९९० चे दशक हे १९८०च्या अगोदर किंवा आसपास ज्यांचा जन्म झाला अशा माझ्यासह अनेकांच्या बालपणचे , कुमार आणि किशोर वयाचे दशक ! आज ही पिढी चाळीशी पार करून कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत, वेगाने बदलणाऱ्या सामाजिक, राजकीय आणि जागतिक समीकरणाला जुळवून घेत आहे. साधारणत: जगात १७५० ते १८५० हा कालखंड औद्योगिक क्रांतीच्या उदयापासून विकासाचा काळ होता.१८५० ते १९५० हा कालखंड औद्योगिकरणाच्या भरभराटीचा, वसाहतवाद आणि जागतिक वर्चस्वाच्या तीव्र स्पर्धेचा काळ म्हणून ओळखला जातो.१९५० नंतरचा काळ हा शीत युद्ध, नव वसाहतवाद, विज्ञान व तंत्रज्ञानाच्या भरभराटीचा आणि जागतिकीकरणाने झपाटलेला काळ होता. झपाट्याने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाला, कुटुंब संस्थेतील आणि सामाजिक नितीनियमांच्या बदलाला कवेत घेत आम्ही वाढत होतो.गोटया ,भवरे, कोया, विटी-दांडू आणि क्रिकेट हे खेळ खेळत आम्ही लहानाचे मोठे होत होतो. आशिकी, मैने प्यार किया, राजा हिंदुस्तानी , सडक आणि दिलवाले या सिनेमांची गीते गाताना आणि ऐकताना होणारी मनाची घालमेल आणि व्याकुळता अनुभवण्याचा आमच्यासाठी तो काळ होता. दूरदर्शनवरील छायागीत,चित्रहार सुरभी, मालगुडी डे, नवीन जुने मराठी, हिंदी चित्रपट, महाभारत, रामायण,द ग्रेट मराठा आणि टिपू सुलतान या साऱ्याची वाट पाहण्याचा, म्हणजेच मनोरंजनासाठी ची आतुरता अनुभवायचा तो काळ होता. सिनेमा म्हणजे अमिताभ, सिनेगीते म्हणजे लता मंगेशकर आणि क्रिकेट म्हणजे सचिन तेंडुलकर असं समीकरण जुळलेला तो काळ होता. क्रिकेट वर्ल्ड कप सामन्यांचा थरार पाहण्यासाठी केलेली दीर्घ प्रतीक्षा; आणि प्रत्यक्ष सिरीज चालू असताना रंगणारे गप्पांचे फड , सामने चालू असताना होणारे जल्लोष आणि हरल्यानंतर वाहिल्या जाणाऱ्या शिव्यांच्या लाखोल्या....... सगळंच अभूतपूर्व होतं.

स्वातंत्र्य दिनाच्या आदल्या दिवशीची तयारी आमच्यासाठी काही औरच असायची. कपड्याला दिलेली अर्धी अर्धवट नीळ , तांब्यात निखारे भरून कपड्यांना केलेली इस्त्री..... त्या दिवशी मनात येणारे देश प्रेमाचे ऊधान! खरंच शब्दबद्धच करता येत नाही. म्हणूनच मला राहून राहून वाटत राहतं.....'कोई लौटा दे मेरे, बीते हुए दिन!'

सायकलवरून केलेला दूर दूरचा प्रवास, मित्रांसोबत केलेली भटकंती, आंब्याच्या शेतात पोट भरून खाल्लेले पाडाचे आंबे. बोरं, ढहाळा ,ऊस खाऊन तृप्ततेने दिलेली ढेकर.... एकमेकांच्या गळ्यात गळे घालून गावभर हिंडणं , गप्पा, टिंगल-टवाळी, त्यानंतर होणारी भांडणं, धरलेला अबोल, दुसऱ्या दिवशी पुन्हा पहिले पाढे पंचावन्न ! म्हणत तुझं माझं जुळेना तुझ्यावाचून करमेना...... अशी आमची जीवापाड ची मैत्री. खरंच म्हणून तर राहून राहून म्हणावं वाटत 'कोई लौटा दे मेरे, बीते हुए दिन!'

शीत युद्धानंतर झालेले रशियाचे विघटन. इराकनं कुवेतवर केलेल्या चढाईमुळे आखाती युद्धाला झालेली सुरुवात. त्यामुळे भडकलेली महागाई,
ही बदलत असलेल जागतिक समीकरण वृत्तपत्रातून आम्ही वाचत होतो. जागतिक राजकारण समजण्या एवढी समज आम्हाला आली नव्हती,पण उत्सुकता मात्र दांडगी होती.

१९९३ ला झालेला किल्लारी भूकंप, राम जन्म भूमी आंदोलन, मुंबईची भीषण दंगल या महत्त्वपूर्ण घटनांचे आकलन होत होत ,परंतु विश्लेषण मात्र करता येत नव्हतं. राष्ट्रावर आलेले आर्थिक संकट आणि त्यातून पंतप्रधान नरसिंगराव यांनी स्वीकारलेलं जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाच धोरण, हे सर्व आमच्यासाठी न समजणारच होतं. याविरुद्ध पेटलेल रान आणि पुढे फार मोठे सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन होणार याची आम्हाला लागलेली चाहूल अस्वस्थ करत होती. सगळं बदलत होतं आणि आम्ही बदलाला सामोरे जात होतो. पुढे अटल बिहारी वाजपेयी यांच्या रूपाने कवी मनाचा पंतप्रधान आम्हाला खूप जवळचा वाटत होता. त्यांच्या-

कौरव कौन
कौन पांडव,
टेढ़ा सवाल है।
दोनों ओर शकुनि
का फैला
कूटजाल है।
धर्मराज ने छोड़ी नहीं
जुए की लत है।
हर पंचायत में
पांचाली
अपमानित है।
बिना कृष्ण के
आज महाभारत होना है,
कोई राजा बने,
रंक को तो रोना है।

अशा काव्यांची आणि सुमधुर,रसाळ वक्तृत्वाची आम्हाला त्या काळी भुरळच पडली होती. त्यांचं १३ दिवसाच सरकार, त्याकाळी सर्वांच्या चर्चेचा विषय ठरल होत. ' पार्टी तोड़कर सत्ता के लिए नया गठबंधन करके अगर सत्ता हाथ में आती है। तो मैं ऐसी सत्ता को चिमटे से भी छूना पसंद नहीं करूंगा।'

अस म्हणून तडकाफडकी संसदेतून त्यांचं बाहेर पडणं, राजीनामा देण.... सगळं विलक्षणच होतं!



किशोर जाधव,सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

भारतान जागतिकीकरण स्वीकारणं हा नीतीने केलेला नवीन कराराच होता. त्याचे दृश्य परिणाम पुढील काळात दिसू लागले. रिमोटच्या साह्याने बदलणाऱ्या टीव्हीवरील चैनल प्रमाण माणसं देखील बदलू लागली. त्यांच्या अपेक्षा, इच्छा, वासना आणि स्वार्थ पराकोटीने वाढत जात होते .सख्खे भाऊ पक्के वैरी कधी बनले हे कळलंही नाही. चंगळवदान माणसाला झपाटून टाकलं. नफेकोरी वाढली. शोषणाचे नवनवीन तंत्रे शोधली जाऊ लागली.

निखळ मैत्री हरवत गेली. उद्देश ठेवून मैत्री करण्याकडे साऱ्यांचा भर दिसू लागला. समोरच्याकडून काय फायदा करून घेता येईल एवढ्यासाठी मैत्रीचे नवे करार केले जाऊ लागले. जागतिकीकरणाने हातात पैसे, सुविधा आणि सुखी संपन्न जीवनमान बहाल केले;पण माणसातील माणूसपण हिरावून नेलं.

आज पिढी चाचपडत आहे.महागडी वाहनं, घरातील सुख सुविधा आणि संपत्ती मिळवण्यासाठी दिसेल त्या मार्गाच्या मागे फरपटत आहे. वाचन संस्कृती सोशल मीडिया पुरती मर्यादित झाली आहे. व्याख्यानमाला ओस पडत आहेत. ग्रंथालयातील पुस्तक देवाण-घेवाण थंडावली आहे.आर्थिक विकासाच्या पलीकडे मानवी जीवनाची गुणवत्ता वाढवण्याच्या उपक्रमांना थंड प्रतिसाद मिळत आहे.

शेवटी, गेलेला काळ परत आणता येत नाही . घड्याळाचे काटे उलटे फिरणार नाहीत. कॅलेंडरची पानं उलटी उलगडली जाणार नाहीत. गेलेली माणसं, गेलेला क्षण परत येणार नाही ; पण तरीसुद्धा माझ्या वयाच्या अनेकांना नक्कीच वाटत राहील ,' कोई लौटा दे मेरे, बीते हुए दिन

# बदलत्या हवामानामुळे येणाऱ्या पावसाचे थैमान!

बदलत्या हवामानामुळे पाऊसाने सुध्दा आपली दीनचर्या बदलल्याचे दिसून येते. वेळेच्या आधी पाऊसाने राज्याच्या अनेक भागांत आक्राळ-विक्राळ रूप धारण केल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान,विज कोसळुन मृत्यूची संख्या,पशुधनाचे नुकसान झाले,पुरपरिस्थिती अशा गंभीर दुर्घटना व समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे.मे महिन्यातच राज्याच्या अनेक भागात रेड अलर्ट तर काही भागात ऑरेंज अलर्ट जाहीर केला आहे म्हणजेच पुढे चालून अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. त्याचप्रमाणे बदलत्या हवामानामुळे आणि ग्लोबल वॉर्मिंगमुळे देशात अती पाऊस,अती उष्णता,अती थंडी, सुनामी हा प्रकार दिवसेंदिवस वाढतच आहे.म्हणजे भारतात उन्हाळा,पाऊसाळा आणि हिवाळा असे तीन ऋतू आपले नियमित कार्य करायचे. परंतु बदलत्या हवामानामुळे संपूर्ण ऋतूंनी आपली दिनचर्या बदलल्याचे स्पष्ट दिसून येते.त्यामुळेच आतापासूनच राज्यासह देशात पाऊसाने विक्राळ रूप धारण केले आहे.यंदा हवामानाच्या अंदाजानुसार (जून ते सप्टेंबर) या कालावधीत सरासरीपेक्षा अधिक म्हणजे देशभरात १०६ टक्के पाऊस कोसळणार असल्याचे सांगितले जाते.यंदाचा महाराष्ट्रातील वरूणराजाचा अंदाज जाहीर झाला असून कोकण-गोवा १०७ टक्के पाऊस, मध्य महाराष्ट्र ११० टक्के पाऊस, मराठवाडा ११२ टक्के पाऊस, विदर्भ १०९ टक्के पाऊस या पेक्षा अधिक पाऊस पडण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. म्हणजेच पावसाचा काळ अत्यंत गंभीर आहे.परंतु सध्या वेळेच्या आधीच अती पाऊस आल्याने महाराष्ट्रासह देशातील अनेक भागांत मोठी तारांबळ उडाल्याचे दिसून आले.परंतु सध्या महाराष्ट्रात पाऊसाचा जोर कायम असून विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, मुंबई, रायगड इत्यादी भागात मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळित झाले असून अनेक भागांत तारांबळ उडाल्याचे दिसून आले व अनेक भागात पुरपरिस्थिती निर्माण झाल्याचे दिसून आले.सध्याच्या परिस्थितीत विदर्भ अलर्ट मोडवर असुन मराठवाड्यातील अनेक भागांत पुरपरिस्थिती आहे.देशात आतापर्यंत आलेल्या पावसाच्या तुलनेत २५ वर्षांच्या काळातील ही सातवी वेळ आहे.यावर्षी पाऊसाचा सांगितलेला अंदाज हा २०13 प्रमाणेच असल्याचे



सांगितले जाते म्हणजेच यावर्षी पाऊस उग्र रूप धारण करू शकतो.सरकारने लक्षात ठेवले पाहिजे की पुर्वीची परिस्थिती आणि आताच्या परिस्थितीमध्ये जमीन-आसमानचा फरक आहे.पुर्वी पाणी जमिनीत मुरायचे त्यामुळे पुरपरिस्थिती लवकर निवळायची.परंतु वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण, जंगलतोड ,अत्याधुनिकरण व मोठ्या प्रमाणात सिमेंटरोडचे जाळे यामुळे राज्यासह देशातील अनेक भागांत जमिनीत पाणी मुरत नसल्याने राज्यासह देशातील अनेक भागांत आपल्याला थोड्याशा पावसातच पुरपरिस्थिती दिसून येते. त्यामुळे राज्यासह देशात येणाऱ्या पावसाचा अंदाज पहाता राज्य प्रशासनाने व केंद्र प्रशासनाने सतर्क राहाने गरजेचे आहे. सध्या सुरू असलेल्या अती पावसामुळे राज्यात आतापर्यंत ४ दिवसांत २१ लोकांचा मृत्यू झाला असून १२ पेक्षा अधिक गंभीर जखमी झाल्याचे सांगितले जाते ही अत्यंत गंभीर बाब आहे.यापुढे येणारा काळ पाऊस किंवा उष्णतामान यात मोठ्या प्रमाणात वाढ होणार असून अत्यंत गंभीर समस्या निर्माण होवू शकतात. सध्या बरसलेल्या धो-धो पावसावरून हवामान खात्याच्या शास्त्रज्ञांतच झालेला पाऊस मोसमी की वळिवाचा (अवकाळी) याबाबत एकमत होत नसुन चांगलीच जुंपल्याचे चित्र चर्चेत आले आहे.कारण मे महिन्यातील पाऊस हा वाजवीपेक्षा अधिक झाल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे.सुरू असलेला पाऊसाचे थैमान व येणाऱ्या पावसाचा अंदाज पहाता स्थानिक प्रशासन, राज्य प्रशासन व केंद्र सरकारने आतापासूनच सतर्क राहाने अत्यंत गरजेचे आहे.कारण वाढत्या शहरीकरणामुळे ड्रेनेज सिस्टीम सुधारणे गरजेचे आहे.कारण सध्याच्या परिस्थितीत एखाद्या पावसामध्येच पुरपरिस्थिती निर्माण झाल्याचे आपण उघड्या डोळ्यांनी पाहीले आहे.त्यामुळे येणाऱ्या पावसापासून होणारे नुकसान टाळण्यासाठी सरकारने आतापासूनच युध्दपातळीवर कार्य करने अत्यंत गरजेचे आहे.त्याचप्रमाणे बदलत्या हवामानामुळे अती पावसाची शक्यता पाहता शेतकरी, शेतमजूर, नदीकाठावरील रहाणारे नागरिक, तलावाच्या काठावर रहाणारे नागरिक, वाहन चालक यांनी येणाऱ्या पावसापासून व विजेपासून सावधगिरी बाळगावी.



रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार )
नागपूर
मो.नं.९९२१६९०७७९,

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव ) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.- 2023/90078

CMYK

www.arambhmarathi.com

दैनिक आरंभ मराठी

संमिश्र रविवार दि.1 जून 2025

विविध वृत्त

## धानुरी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी



आरंभ मराठी | लोहारा

३१ मे रोजी संपुर्ण राज्यात राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. धानुरी ग्रामपंचायतच्या वतीने राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यादेवींच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. धानुरी ग्रामपंचायत कार्यालयात सकाळी आहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन सरपंच प्रविण थोरात व उपसरपंच राम नाना पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी राहुल पवार, माजी सरपंच गणेश जाधव, माजी उपसरपंच संभाजी वडजे, ग्राम सदस्य सचिन तिगाडे, सूरज साळुंके, विठ्ठल सूर्यवंशी, सुभाष वाळके, शँकर यादव, गंगाधर तिगाडे, विनोद सूर्यवंशी, यालालिंग घोडके, हणमंत तिगाडे, पांडुरंग सूर्यवंशी, नागेश सूर्यवंशी व इतर उपस्थित होते.

## शिवसेना शेतकरी संघटनेच्या भूम तालुका अध्यक्षपदी केशव चव्हाण यांची निवड



आरंभ मराठी | भूम

शिवसेनेचे ज्येष्ठ नेते केशव चव्हाण यांची भूम तालुका शिवसेना शेतकरी संघटनेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याने त्यांचे शिवसेना शाखा ईटच्या वतीने सत्कार करण्यात आला. ग्रामपंचायत सभागृहामध्ये झालेल्या कार्यक्रम प्रसंगी वि.वि.कार्यकारी सोसायटीचे चेअमन हनुमंत देशमुख, शिवसेना विभागप्रमुख गोरख शिंदे, शहराध्यक्ष बाळासाहेब हाडुळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाप्रसंगी ग्रामपंचायत सदस्य बापूसाहेब खांडेकर, भीमराव माने ,वसंत देशमुख, हुंबे सर प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी नूतन अध्यक्ष केशव चव्हाण यांनी बोलताना सांगितले की पक्षाने दिलेल्या पदाचा उपयोग मी जनतेच्या कमासाठी निश्चित करेल.

## गोविंदपूर येथे अहिल्यादेवी होळकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन



आरंभ मराठी | गोविंदपूर

कळंब तालुक्यातील गोविंदपूर येथे ग्रामपंचायत कार्यालयात राष्ट्रमाता अहिल्या देवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सरपंच आशोक मस्के, माजी चेअरमन आण्णासाहेब सौदागर, कबन मुंडे, सुर्यकांत पाटील, शरद सौदागर, बाबा सौदागर, आशोक सौदागर, शंकर मुंडे, तानाजी सौदागर, सखाराम सौदागर,राजेंद्र मुंडे, विश्वनाथ सुरवसे,बाळू जाधव, सुभाष सौदागर,बाळू सौदागर,विष्णू सौदागर, बप्पा सौदागर व गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पळसप येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



आरंभ मराठी | पळसप

ज्या काळात स्त्रियांना घराचा उंबरा ओलांडता येत नव्हता, अशा काळात बहुजन समाजातील महिला आत्मनिर्भर बनली पाहिजे यासाठी कसोशीने प्रयत्न करणाऱ्या, प्रत्यक्ष जनतेच्या तक्रारी ऐकून त्यावर तात्काळ निर्णय घेऊन न्यायपूर्ण आणि लोकाभिमुख राज्यकारभार चालवला जातो याचे ऊत्तम उदाहरण म्हणजे राजमाता अहिल्यादेवी होळकर. ३१ मे हा त्यांचा जन्मदिवस सगळीकडे जयंतीदिन म्हणून साजरा केला केला जातो.

त्यानिमित्त धाराशिव तालुक्यातील पळसप येथे अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मोठ्या उत्सहात साजरी करण्यात आली. प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अहिल्यादेवी यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी तंटामुक्त अध्यक्ष विजय करंजकर, शिवसेना नेते शिवाजी सरडे , उपसरपंच राम लाकाळ, युवा सेनेचे संघटक सुरज सुरवसे, माजी उपसरपंच दिपक सरडे, पोलीस पाटील, समाधान फुटाणे तसेच रवी काळे, जनक काळे, म्हाळाप्पा दाणे, विक्रम दाणे, कल्याण लाकाळ, प्रवीण लाकाळ, महादेव निकम, आकृर सरडे, विष्णु लाकाळ आदी उपस्थित होते.

# केसरजवळगा येथे वीरशिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांची ४८५ वी जयंती उत्साहात साजरी

## बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच खेळाडूंचा सत्कार

आरंभ मराठी | माडज

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी केसरजवळगा गावामध्ये वीर शिरोमणी,हिंदू कुलभूषण महाराणा प्रतापसिंह यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. सकल राजपूत समाज बांधवांच्या वतीने वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. जयंती उत्सवाच्या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून सकल राजपूत समाज संघटना केसरजवळग्याचे अध्यक्ष भारतसिंग राजपूत हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच अमोल पटवारी, विद्यमान उपसरपंच अझर ईनामदार, ग्रामपंचायत सदस्य शिवाजी घोडके, गुरव समाज संघटनेचे अध्यक्ष श्रीशैल बिराजदार, लिंगायत समाज संघटनेचे अध्यक्ष संजय पाटील, शुभम कांबळे, शब्बीर चाचा, राजपूत महिला आघाडी केसरजवळगा अध्यक्ष अरुणाबाई राजपूत आदी मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या हस्ते महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर केसर जवळगा गावातून इयत्ता दहावीमध्ये गुणवंत झालेल्या सर्वच विद्यार्थ्यांचे सत्कार करण्यात आले. त्याचबरोबर लाठी काठी स्पर्धेमध्ये दिल्ली येथे जाऊन कांस्यपदक घेणाऱ्या आरोही पटवारीचा सत्कार करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचे आयोजन समाज बांधव रतन सिंग चौहान यांच्यातर्फे करण्यात आले होते. गावातील प्रत्येक समाजातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळून त्यांनी आपली गुणवत्ता वाढवावी हा सर्व राजपूत समाज बांधवांचा उद्देश आहे, त्या उद्देशामुळेच दरवर्षी केसर जवळगा गावातील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येतो. जयंती प्रसंगी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी महाराणा यांच्या जीवनावर आपल्या भाषणातून प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला. यामध्ये स्वराली विजयसिंग राजपूत, अनया राजपूत, श्रेया ठाकूर, दर्श ठाकूर, अमूल्या राजपूत, रणवीर राजपूत, विराट राजपूत या विद्यार्थ्यांनी आपली मनोगते सादर केली. त्याचबरोबर प्रवीण ठाकूर यांनी महाराणाजींच्या इतिहासाची माहिती प्रास्ताविकातून मांडली. प्रमुख पाहुण्यांच्या मनोगतामध्ये अमोल पटवारी यांनी राजपूत समाज बांधवांनी गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचा अनोखा उपक्रम गावांमध्ये राबवून एक वेगळेपण सिद्ध केल्याचे सांगितले. जयंती उत्सवामध्ये महाप्रसादाचे अन्नदान बाबूसिंग राजपूत, रतनसिंग चौहान, नरसिंग राजपूत, चरणसिंग राजपूत, उमेशसिंग राजपूत, राहुलसिंग राजपूत, बालाजीसिंग राजपूत, सुनिलसिंग राजपूत, अजितसिंग राजपूत, विठ्ठलसिंग राजपूत(नरोणे) आदींनी केले. जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष म्हणून कैलाससिंग राजपूत, उपाध्यक्ष म्हणून हरिसिंग राजपूत त्याचबरोबर अजितसिंग राजपूत यांनी काम पाहिले. कार्यक्रमासाठी सकल राजपूत समाज संघटनेचे अध्यक्ष भारतसिंग राजपूत व सर्व समाज बांधवांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रवीण ठाकूर यांनी तर आभार प्रदर्शन अमोल राजपूत यांनी केले.



## कृषी विकसित भारत संकल्प अभियानात भारतीय किसान संघ धाराशिवचा सक्रिय सहभाग

आरंभ मराठी | धाराशिव

संपूर्ण भारत देशात केंद्र सरकारच्या कृषी विभागामार्फत दिनांक २९ मे २०२५ ते १२ जून २०२५ दरम्यान ''विकसित कृषी संकल्प अभियान '' राबविले जात आहे. यामध्ये शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देणे, मृदा कार्डच्या उपयोग, शासनाच्या विविध योजनांची माहिती देणे. याकरिता कमीत कमी २००० शाश्त्रज्ञ, कृषी अधिकारी, सोबत , संस्थ्या मिळून दुर्गम भागातील शेतकऱ्यांच्या गावात जाऊन संवाद साधणार आहेत. यामध्ये १ ते १.५ करोड शेतकऱ्यांसोबत संवाद साधला जाणार आहे. मागील महिन्यात भारत सरकारचे केंद्रीय कृषी कल्याण मंत्री श्री. शिवराजसिंह चौहान यांनी भारतीय किसान संघाचे अखिल भारतीय संघटन मंत्री दिनेश कुलकर्णी यांना पत्र लिहून ''विकसित कृषी भारत संकल्प अभियान'' मध्ये भारतीय किसान संघाच्या देशभरातील कार्यकर्त्यांना सक्रिय सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले होते. सोबतच जिल्हा प्रतिनिधीनां रचनात्मक कार्य करण्यास सूचित करण्याची विनंती केली होती. या अभियानाची सुरवात २९ मे रोजी महाराष्ट्रात परभणी येथून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिरवा झेंडा दाखवून केली होती. याच दिवशी तुळजापूर तालुक्यातील ६ गावांतून तुळजापूर कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख सचिन सूर्यवंशी, डॉ. भगवान अरबाड, आत्मा कार्यालयातील व कृषी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शेतकऱ्यांशी त्यांच्या गावात जाऊन संवाद साधून केला. यामध्ये वरील उपक्रमाचा प्रचार व प्रसार करणे कामे भारतीय किसान संघाच्या कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. आदल्या दिवशी गावा गावातील मंदिराच्या स्पिकर वरून माहिती देणे, गावातील शेतकऱ्यांना कार्यक्रम स्थळी येण्यास प्रवृत्त करणे, कार्यक्रमाची व्यवस्था लावण्यास अधिकाऱ्यांना मदत करणे,स्वतः उपस्थित राहणे इ.कामात सहभाग नोंदविला होता. अश्याच प्रकारचा सहभाग पुढील पंधरा दिवस भारतीय किसान संघाचे जिल्हा कार्यकर्ते संपूर्ण जिल्हाभर करणार असल्याचे माहिती भारतीय किसान संघ जिल्हा धाराशिवचे जिल्ह्याचे अध्यक्ष नितीन घुले वाशी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

## ईट येथे माजी विद्यार्थी स्नेहसंमेलनात गुरुजनांचा सन्मान

आरंभ मराठी | भूम

भूम तालुक्यातील ईट येथील न्यू हायस्कूल जुनियर कॉलेजच्या सन २००२ - २००३ विद्यार्थ्यांचा स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम रायगड मंगल कार्यालय येथे संपन्न झाला असून,सोहळ्यामध्ये माजी गुरुजनांचा विद्यार्थ्यांच्या वतीने सत्कार सोहळा करण्यात आला. कार्यक्रमामध्ये माजी विद्यार्थी आपल्या शाळेतील बालपणापासून ते दहावीपर्यंत जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात विद्यादेवता सरस्वतीच्या वंदनेने आणि दीप प्रज्वलित करून झाली. या प्रसंगी शिक्षकांनी जुन्या आठवणीत मजेदार किस्से व अनुभव सांगितले. स्नेहसंमेलन प्रसंगी विद्यार्थ्यांच्या वतीने शिक्षकांचा पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माजी विद्यार्थ्यांनी आपले शाळेतील अनुभव व शिक्षकाप्रती असलेला आदर याबाबत आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी मुलांमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून शासनाच्या सेवेत असलेले चंद्रकांत भोसले यांनी आपल्या शाळेतील अनुभवा बरोबरच पुढील शासकीय सेवेतील अनुभवाचे कथन केले. तसेच भगवान चव्हाण, मुलींमध्ये लंका खरात यांची भाषणे झाली. यावेळी हायस्कूलचे मुख्याध्यापक गायकवाड सर यांनी माजी विद्यार्थ्यांना जीवन जगण्यासाठी योग्य मार्गदर्शन करून भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मनोज हुंबे , राहुल कुचेकर यांनी परिश्रम घेतले. स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमानंतर स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद सर्वांनी मिळून मिसळून घेतला. कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी मुख्याध्यापक गायकवाड, प्रमुख पाहुणे म्हणून डोके सर, ठवरे सर, भोजणे सर, डोके सर, चव्हाण सर, लहाने सर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधाकर मुळे यांनी केले.

## महाविकास आघाडीकडून राजमाता अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

आरंभ मराठी | तुळजापूर



महाविकास आघाडी तुळजापूर यांच्या वतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या मूर्तीस अभिवादन करण्यात आले. ढोल पथक व ताशाच्या गजरामध्ये छत्रपती शिवाजी महाराज चौक, आंबेडकर चौक ते काँग्रेस कार्यालय अशी रॅली काढण्यात आली. यावेळी जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष धीरज पाटील, ऋषी मगर, अमोल कुतवळ ,उत्तम अमृतराव, भाऊ भांजी, नरेश पेंदे , रणजीत इंगळे, आनंद जगताप, सुदर्शन वाघमारे ,बालाजी तट, तालुकाध्यक्ष रामचंद्र आलुरे, श्याम पवार, सुधीर कदम, बापू नाईकवाडी, सुनील जाधव, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अमर चोपदार , तौफिक शेख ,शरद जगदाळे, बालाजी बंडगर, खंडू शिंदे ,श्रीकांत धुमाळ, किरण यादव, मधुकर शेळके, आकाश शिंदे, किरण कांबळे, स्वरूप कांबळे ,बाळासाहेब कदम यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## तेर येथे अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी

आरंभ मराठी | तेर


धाराशिव तालुक्यातील तेर येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. मध्यरात्री अहिल्यादेवी होळकर चौकात फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. चौकाला विद्यूत रोषणाई करण्यात आली होती. ग्रामपंचायत कार्यालयासह विविध ठिकाणी अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. ३१ मे रोजी सकाळी राजमाता अहिल्यादेवी यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पुजन करण्यात आले. यावेळी धनगर समाजाच्या तरूणांनी पारंपरिक धनगरी ढोलाच्या तालावर पारंपरिक खेळ खेळून अभिवादन केले. यावेळी भागवत भक्ते, तानाजी पसारे, गोरोबा पाडूळे, इंद्रजीत कोळपे, अनिल टेळे, बालाजी पांढरे, नवनाथ पसारे, अजित कदम, शाम गायके, रमाकांत लकडे, हरि भक्ते, कृष्णा पडूळकर, किरण ठोंबरे, नामदेव कांबळे, दत्ता भक्ते, राजाभाऊ पसारे, दादा पसारे, हनुमंत पसारे, गजेंद्र सौदागर, उमेश सौदागर यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



## नळदुर्ग येथे अहिल्यादेवी होळकर यांना जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांतून अभिवादन

आरंभ मराठी | नळदुर्ग

देशातील अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार करुन हिंदु संस्कृतीचे जतन करण्याचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य महान आहे असे उद्गार नळदुर्ग शहर ब्राम्हण समाजाचे अध्यक्ष व माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांनी नळदुर्ग येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती जन्मोत्सव समितीच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलतांना काढले. नळदुर्ग येथे ३१ मे रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती जन्मोत्सव समितीच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती साजरी करण्यात आली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकात झालेल्या कार्यक्रमात सेवानिवृत्त शिक्षक बाबुराव पोतदार यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याचे पुजन करण्यात आले. यावेळी भाजपचे नळदुर्ग शहर अध्यक्ष व माजी नगरसेवक बसवराज धरणे, शहर ब्राम्हण संघाचे अध्यक्ष माजी नगरसेवक विनायक अहंकारी, भाजयुमोचे तालुका सरचिटणीस श्रमिक पोतदार,भाजयुमोचे नळदुर्ग शहर अध्यक्ष गणेश मोरडे,उत्तम बनजगोळे, अक्षय भोई, विजय ठाकुर, शिवसेना शिंदे गटाचे बंडप्पा कसेकर, राजेंद्र ठाकुर, शिवसेनेचे नेताजी महाबोले,सन्नी भुमकर यांच्यासह पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती जन्मोत्सव समितीचे ज्ञानेश्वर घोडके, दयानंद चौरे, प्रभाकर घोडके, पद्माकर घोडके, मारुती घोडके, सुहास येडगे, विलास येडगे, निखिल येडगे,अमर भाळे, अमित शेंडगे, दत्ता घोडके यांच्यासह धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलतांना विनायक अहंकारी यांनी म्हटले की, अहिल्यादेवींचे कार्य जगात महान असुन मध्ययुगीन भारताच्या इतिहासामध्ये पुरुषांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वोत्तम राजे होते, तर महिलांमध्ये सर्वोत्तम साम्राज्ञी म्हणुन अहिल्यादेवी होळकर यांचा इतिहास आपल्या सर्वांसमोर आहे. येणाऱ्या काळात वृक्षारोपण असेल किंवा अहिल्यादेवींचा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचे काम समिती करीत आहे असेही विनायक अहंकारी यांनी म्हटले. यावेळी ज्ञानेश्वर घोडके यांनीही पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याची माहिती दिली.



## दागिने,चार दुचाकीसह दोन अट्टल चोर जेरबंद

आरंभ मराठी | धाराशिव

सोन्याचे मौल्यवान दागिने व चार मोटार सायकलसह दोन अट्टल आरोपींना पकडण्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला यश आले. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार यांच्या आदेशावरुन सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खटके, अमोल मोरे, जानराव, वाघमारे, जाधवर, चालक बोईनवाड यांचे पथक जिल्ह्यातील चोरीच्या गुन्ह्यातील आरोपींना पकडण्यासाठी पेट्रोलिंग करत होते. त्यावेळी या पथकास गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, दोन अनोळखी व्यक्ती चोरीचे दागिने व मोटरसायकल विक्री करण्यासाठी अपसिंगा रोड तुळजापूर येथे येणार आहेत. बातमी मिळाल्यावरुन पथकाने त्या ठिकाणी जावून धोंडीराम महादेव शिंगाडे (वय ४२ वर्षे, रा. शिरताव ता. मान जि. सातारा) आणि अनिल हरिश्चंद्र माने (वय ३३ वर्षे, रा. वासुदेव गल्ली, तुळजापूर) यांना ताब्यात घेतले. त्यांचेकडे असलेल्या मोटरसायकली व सोन्याबाबत त्यांच्याकडे विचारपुस केली असता, त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यांना पोलिसी खाक्या दाखवताच त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.

दैनिक आरंभ मराठी
www.arambhmarathi.com
आपलं धाराशिव....
रविवार दि.1 जून 2025

# भूम तालुक्यातील पाचही मंडळात पूर्वमोसमी पावसाची जोरदार हजेरी

## शेतीचे प्रचंड नुकसान,घरांची पडझड तर भाजीपाल्याचा झाला चिखल

दत्ता अहिरे | आरंभ मराठी

ईट -भूम तालुक्यात मे म हिन्याच्या कडक उन्हाळ्यात मात्र जूनमधील पावसा प्रमाणे पर्जन्यवृष्टी होऊन शेतजमिनी, रस्ते, पिके ,घरे यांना मोठा फटका बसला असून प्रचंड नुकसान झाले आहे. तालुक्यातील भूम, वालवड, ईट, आंबी, माणकेश्वर ही पाच मंडळे असून तालुक्यात सरासरी ६७ मिमी पावसाची नोंद झाली आहे. तर सर्वाधिक पाऊस ईट मंडळात झाला आहे. तालुक्यातील झालेल्या पावसाने सर्व मंडळातील मध्यम, लघु प्रकल्प, बंधारे यामध्ये पाणीसाठा वाढला आहे. तर नदी नाले खळखळून वाहत आहेत. सतत झालेल्या पावसामुळे भाजीपाला उत्पादकांना मोठा फटका बसला आहे. चिंचोली येथील शेतकऱ्याच्या कोबी चा प्लॉट पूर्णपणे नासला आहे. तर फळबाग, कांदा उत्पादक यांना देखील पावसाचा मोठा फटका बसला आहे. शेती पिकांच्या झालेल्या नुकसानाबद्दल नुकसान भरपाईची मागणी होत आहे. भूम-बार्शी मार्गे जाणाऱ्या रस्त्यावर भांडगाव जवळ फुलावर पाणी आल्यामुळे रस्ता उखडून गेला आहे. तर कुंथलगिरीकडे जाणाऱ्या रस्त्यावरील साठवण तलावाजवळ देखील रस्त्याचे मोठे नुकसान झाले आहे. ईट येथील पोपट शिंदे यांनी बांधकाम केलेली विहीर पूर्णपणे बुजून गेली आहे. तसेच गावातील जुन्या घरांच्या भिंती पडल्या आहेत तर माळवदाच्या घरातून पाणी टिपकू लागले आहे. शेतकऱ्याला नैसर्गिक संकटाला सामोरे जात असताना शेतीच्या मशागतीची कामे पेरणी पूर्व कशी करावीत हा प्रश्न पडला असून बी बियाणे खते याबरोबरच शेतीचे मशागत करणे गरजेचे झाले आहे.





### शेतकऱ्यांना मशागतीची चिंता

पाऊस जास्त झाल्याने शेतीतील मशागत कशी करावी हा प्रश्न शेतकऱ्यासमोर उभा आहे. सततच्या झालेल्या पावसामुळे शेतातील तन-तोडा प्रचंड वाढल्यामुळे फवारणी करावी की पाळी, मोगडणी करावी हा प्रश्न पडला आहे. येणारा काळ देखील निसर्गावर अवलंबून आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातात फक्त अंदाज बांधत कष्ट करणे हेच आहे.

-रामराजे देशमुख शेतकरी, ईट.

### झालेल्या नुकसानीची मदत द्यावी

बी बियाणे, खते मागणीप्रमाणे मिळत नसल्याने, आहे ते बियाण्याचे वाण घेऊन पेरणी करावी लागणार आहे. तर खतपुरवठा देखील त्याप्रमाणेच होत आहे. शेतकऱ्याचे शेतातील झालेले नुकसान व बंदिस्तीसाठी शासनाने मदत करावी.

-दिलीप हुंबे
शेतकरी, पांढरेवाडी

# अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त मोहा ग्रामपंचायत कार्यालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्रात अभिवादन कार्यक्रम



आरंभ मराठी । मोहा

अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त कळंब तालुक्यातील मोहा ग्रामपंचायत कार्यालय व प्राथमिक आरोग्य केंद्रात अभिवादन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक न्याय आणि सशक्त स्त्री नेतृत्वाचे प्रतीक असलेल्या अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मृतीस अभिवादन करत ग्रामस्थांनी त्यांचा आदर्श जीवनमार्ग स्मरणात ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.ग्रामपंचायत कार्यालयात झालेल्या अभिवादन कार्यक्रम ात सरपंच श्रीमती सीमा मडके, उपसरपंच बशारत मोमीन, जिल्हा परिषद माजी सदस्य संदीप मडके, ग्रामसेवक सुरेश धावारे, पांडुरंग मडके, राहुल कसबे यांची उपस्थिती होती. यावेळी अहिल्यादेवींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. त्यानंतर प्राथमिक आरोग्य केंद्रातही अहिल्यादेवींच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रम ात वैद्यकीय अधिकारी डॉ. मनीष कस्पटे, डॉ. सुमित मुंढे, औषध निम ाण अधिकारी शुभम कोंपलवार, आरोग्य सहाय्यक बाबुराव सुलाखे, आरोग्य सहाय्यिका श्रीमती जाधव, परिचारिका श्रीमती स्वामी, श्रीमती शिंदे, श्रीमती चामनार, आरोग्यसेवक विशाल सदाफुले, प्रशिक्षणार्थी अविनाश सुरवसे यांची उपस्थिती होती. अहिल्यादेवी होळकर यांनी सम ाजसेवा, धर्मशाळा, विहिरी, घाट, रस्ते यांसारख्या विकास कामांद्वारे जनतेच्या जीवनात परिवर्तन घडवून आणले. त्यांचा आदर्श आजही प्रेरणादायी आहे, असे मत उपस्थित मान्यवरांनी यावेळी व्यक्त केले.

# येरमाळ्यात हजारो भाविकांच्या उपस्थितीत श्री लक्ष्मण शक्ती सोहळा उत्साहात

## रामभक्त भाविकांची पावसातही मोठ्या प्रमाणात उपस्थिती

आरंभ मराठी | येरमाळा

कळंब तालुक्यातील येरमाळा येथे गुरुवारी (दि.२९) श्री लक्ष्मण शक्ती सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या वर्षी बऱ्याच वर्षाच्या कालखंडानंतर प्रथमच येरमाळा येथे श्री.लक्ष्मण शक्ती सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला असुन श्री. संत एकनाथ महाराज लिखित श्री.भावार्थ रामायणाचे हे बऱ्याच वर्षानंतर पहिलेच वर्ष होते. गुरुवारी चार वाजता वनवासातून आलेले रामभक्त दिंडी आणि ग्रंथ दिंडी येरमाळा गावातून काढण्यात आली. या ग्रंथदिंडी मध्ये लहान बालकांसह महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. या कार्यक्रमाचे आयोजन हनुमान मंदीरासमोर केले होते. परंतु, सततच्या पावसामुळे तो विठ्ठल रुक्मिणी मंदिर (आनंदधामकार्यालय ) येथे करण्यात आला. दि. २९ मे रोजी सायंकाळी ६ वाजता ग्रंथ वाचन व निरुपणास सुरुवात करण्यात आली. तब्बल बारा तास हा श्री लक्ष्मण शक्ती सोहळा सुरू होता. श्री.भावार्थ रामायणातील युद्धकांडातील अध्याय क्रमांक ४३ ते ४९ असे सात अध्याय, ओव्या ११३५ याचे रात्रभर वाचन




व निरूपण करण्यात आले. या लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळ्यास परिसरातील तुळजापुर, कळंब, धाराशिव, उमरगा, लातुर या तालुक्यांसह कर्नाटक राज्यातून देखील ग्रंथ वाचक व सूचक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गुरुवारी दि. २९ मे रोजी सायंकाळी ६ वाजता सुरू केलेले ग्रंथ वाचन निरूपण शुक्रवारी दि.३० रोजी सकाळी ६ वाजता श्री लक्ष्मण सावचित्य झाल्या नंतर लक्ष्मण शक्ती सोहळ्याची सांगता करण्यात आली. जय श्रीराम जय श्रीराम च्या जय घोषाने येरमाळा गाव राम मय झाले. येरमाळा येथील श्री लक्ष्मण शक्ती सोहळा हा न भूतो न भविष्यती असाच झाला. जवळपास हजारो रामभक्त श्रीराम कथा श्रवण करण्यासाठी उपस्थित होते. सकाळी महाआरती नंतर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये प्रसादाचे वाटप करण्यात आले. परिसरातील जवळपास चार ते पाच हजार रामभक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. अगदी नियोजनबद्ध श्री लक्ष्मण शक्ती सोहळा संपन्न झाल्याने येरमाळा परिसरातून रामभक्त ग्रामस्थांचे कौतुक केले जात आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुरेश बारकुल, पी. एम. बारकुल, अंकुश पाटील, रमेश पवार यांच्यासह गावातील अनेक रामभक्तांनी परिश्रम घेतले.

# लातूर सेंट्रल बस स्थानकातून पूर्वीप्रमाणे पुणे, बार्शी,धाराशिव, औसा, निलंगा बस सुरू होणार

## विविध सामाजिक संघटनेच्या पाठपुरावाला यश

## मुरुड सकल मराठा समाजाकडून निर्णयाचे स्वागत

आरंभ मराठी | मुरुड

लातूर मध्यवर्ती बस स्थानक येथील सिमेंट काँक्रीटचे काम मागील २ महिन्यांपूर्वी पूर्ण झाले असतानाही एस. टी महामंडळ विभागाने पुणे, धाराशिव, बार्शी व औसा, निलंगा या महामार्गावरील बस सेवा ही बस स्थानक क्रमांक २ रेणापूर नाका या ठिकाणाहून चालू ठेवली होती. मागील २ महिन्यापासून विविध सामाजिक संघटना ,राजकीय पक्ष यांची सततची मागणी होती की, मुख्य बस स्थानकातूनच पूर्वीप्रमाणे बसेस सोडाव्या कारण मुख्य बस स्थानकाच्या परिसरात मार्केट यार्ड ,व्यापारी पेठ, शैक्षणिक संकुल, शासकीय रुग्णालय, खाजगी रुग्णालय असल्यामुळे लातूर ग्रामीण भागातून तसेच इतर जिल्ह्यातून येणाऱ्या नागरिकांच्या सोयीचे असल्यामुळे व महिला ,विद्यार्थी, नागरिक यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सुद्धा योग्य असल्यामुळे पूर्वीप्रमाणे मुख्य बस स्थानकातूनच सर्व बसेस सोडाव्या अशी जनतेची सुद्धा मागणी होती. दिनांक २६ मे २०२५ रोजी जिल्हाधिकारी लातूर तथा अध्यक्ष - जिल्हा रस्ते सुरक्षा समिती, लातूर यांच्या अध्यक्षतेखाली सदरील विषयासंदर्भात बैठक संपन्न झाली. त्या बैठकीत विविध सामाजिक संघटनांनी मुख्य बस स्थानकातूनच पूर्वीप्रमाणे बसेस सोडाव्या ही मागणी केली होती. लातूर जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने बैठकीत जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले सदरील निवेदनात दिनांक ३१ मे २०२५ पर्यंत पूर्वी प्रमाणे मुख्य बस स्थानकातून बसेस चालू नाही केल्यास एस. टी महामंडळ वर्धापन दिन दिनांक १ मे २०२५ वार रविवार रोजी सकाळी १० वाजून १० मिनिटांपासून दयानंद गेट चौक, लातूर या ठिकाणी बेमुदत अमरण उपोषण सुरू करण्यात येईल असे सदरील सांगण्यात आले होते. लातूर जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या बेमुदत आमरण उपोषणाची तसेच सकल मराठा समाज मुरुड व विविध सामाजिक संघटना करत असलेल्या पाठपुराव्याची दखल घेत दिनांक ३० मे २०२५ रोजी देविदास जाधव (आयुक्त, शहर महानगरपालिका लातूर) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. या बैठकीला आशिष कुमार अय्यर (उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, लातूर ) अश्वजीत जानराव (विभाग नियंत्रक रापम ,लातूर) संदीप पडवळ (विभागीय वाहतूक अधिकारी रापम लातूर ) नवनाथ केंद्रे (शहर अभियंता लातूर शहर महानगरपालिका, लातूर) , बाबुराव गीते (पोलीस उपनिरीक्षक वाहतूक नियंत्रण शाखा गांधी चौक, लातूर) हे जिल्हा सुरक्षा समिती लातूर या समितीचे सदस्य म्हणून वरील अधिकारी उपस्थित होते. तसेच विविध



सामाजिक संघटना व राजकीय पक्ष यांचे प्रतिनिधी बैठकीला उपस्थित होते. बैठकीम ध्ये मोठ्या प्रमाणात सदरील विषयावर चर्चा झाल्यानंतर व बैठकीमधील सर्व प्रतिनिधींनी एक मताने असा निर्णय घेतला की पूर्वीप्रमाणेच मध्यवर्ती बस स्थानकातून बसेस चालू कराव्यात त्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय आम्हाला मान्य नाही . प्रशासनाने वाहतूक कोंडी च्या नावाखाली सदरील बसेस ह्या बस स्थानक क्रमांक २ रेणापूर नाका या ठिकाणी सुरू केलेल्या होत्या.त्यामुळे प्रशासनाची इच्छा नसताना सुद्धा बैठकीतील प्रतिनिधीच्या रेट्या मुळे मुख्य बस स्थानकातून पूर्वीप्रमाणेच बसेस सोडण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार सदरील बैठकीत निर्णय घेऊन अंतिम मंजुरीसाठी जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे सदरील प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. सदरील प्रस्तावाबद्दल दिनांक २६ मे २०२५ च्या बैठकीमध्ये जिल्हाधिकारी या सकारात्मक होत्या त्यामुळे लवकरात लवकर सदरील निर्णय होऊन दिनांक १जून २०२५ एस टी महामंडळ वर्धापनदिनी पूर्वीप्रमाणे मुख्य बस स्थानकातून पुणे ,धाराशिव, बार्शी तसेच औसा, निलंगा या मार्गावरील बस सुरू कराव्यात अशी मागणी मा.आयुक्त व माननीय विभाग नियंत्रक यांच्याकडे करण्यात आली आहे.

# प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभाच्या रकमेत २ लाखापर्यंत वाढ

## लाभार्थ्यांच्या मागणीनंतर शासनाने केली साठ हजारांची वाढ

आरंभ मराठी | कळंब

भारत सरकारने ''सर्वांसाठी घरे-२०२४'' हे शासनाचे धोरण असून, त्यानुसार राज्यातील बेघर तसेच कच्च्या घरात वास्तव्यास असणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना स्वत:चे हक्काचे घर मिळावे असा प्रयत्न शासनाचा आहे. त्यानुसार राज्यात ग्रामीण भागातील बेघरांना घरकुल उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत विविध घरकुल योजना राबविण्यात येत आहेत. सर्वांसाठी घरे या संकल्पनेतून प्रधानमंत्री आवास योजना सुरु केली होती. मात्र यासाठी प्रथमत: शासनाकडून मिळणारी लाभाची रक्कम नाममात्र होती. त्यामुळे बऱ्याच नागरिकांनी याकडे पाठ फिरवली होती. कारण घर बांधण्यासाठी लागणारा खर्च व मिळणारा लाभ यात बऱ्याच प्रमाणात तफावत होती. त्यामुळे बांधकाम करताना लाभार्थी हा कर्जबाजारी होत होता. त्यामुळे बांधकाम न केलेलेच बरे अशी भावना नागरिकांची झाली होती. त्या अनुषंगाने दैनिक 'आरंभ मराठी' दैनिकात पाठपुरावा ही केला होता. प्रधानमंत्री आवास योजनेच्या रकमेत १ लाख ४० हजारावरून २ लाखापर्यंत वाढ ग्रामीण भागासाठी करण्यात आलेली आहे. प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत घरकुल नोंदणी २०२५ चालू आहे. यासाठी ३१ मे २०२५ पर्यंत नोंदणी करणे गरजेचे आहे. मात्र ऑनलाईन प्रकिया पार पाडताना बऱ्याच अडचणी येत आहेत. काही नागरीकांकडे नोंदणीसाठी अत्यावश्यक असणारा जॉब कार्ड क्रमांक नाही. त्यामुळे बरेच लाभार्थी या योजनेपासून वंचित राहू शकतात. मात्र ज्यांच्याकडे जॉब कार्ड क्रमांक नाही त्यांनी त्यांच्या ग्राम पंचायत कर्मचारी मार्फत नोंद करणे गरजेचे आहे. ऑनलाईन प्रकिया पार पाडताना बऱ्याच अडचणीमुळे शासनाने यात मुदतवाढ करावी अशी नागरिकांची भावना व्यक्त होत आहे.



### आतापर्यंत ८५०० नागरिकांनी केली नोंद

आतापर्यंत कळंब तालुक्यात ८५०० नागरिकांनी प्रधानमंत्री आवास योजनेसाठी अर्ज केला आहे अशी माहिती गटविकास अधिकारी आर. व्ही.चकोर यांनी दिली. या नोंदणी केलेल्या नागरीकांतून लाभार्थ्यांची निवड होणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त नागरिकांनी नोंद करणे गरजेचे आहे,अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

# येरमाळा येथे नशा मुक्ती रॅली उत्साहात

## व्यसनमुक्त भारत, सशक्त भारतचा नारा ठरला केंद्रबिंदू



आरंभ मराठी | येरमाळा

पोलीस स्टेशन येरमाळा आणि येडाई व्यसनमुक्ती उपचार व पुनर्वसन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने ''अमली पदार्थ विरोधी महिना'' या उपक्रमांतर्गत नशा मुक्ती रॅलीचे भव्य आयोजन करण्यात आले होते. गावामध्ये जनजागृती घडवून व्यसनमुक्त समाज निर्मितीचा संकल्प या रॅलीतून करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थितींमध्ये येरमाळा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक टी. आर. भालेराव, येडाई व्यसनमुक्ती केंद्राचे संचालक डॉ. संदीप तांबारे, माजी जिल्हा परिषद सदस्य मदन तात्या बारकुल, सरपंच प्रतिनिधी विशाल बारकुल, उपसरपंच गणेश बाबा बारकुल, ग्राम पंचायत सदस्य सोमनाथ बारकुल, मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष लहू बारकुल, येडेश्वरी देवस्थान ट्रस्टचे गणेश बेद्रे, संतोष आगलावे सम ाजसेवक विलास बारकुल, येडाई व्यसनमुक्ती केंद्राचे प्रकल्प समन्वयक गणपतसिंग परदेशी, तसेच पोलीस आणि व्यसनमुक्ती केंद्राचे सर्व कर्मचारी, परिवर्तनवादी रुग्णमित्र, ग्रामस्थ आणि युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. रॅलीची सुरुवात जोशपूर्ण झुंबा वर्कआउटने झाली. रॅलीदरम्यान ''व्यसनाला नाही म्हणूया'', ''स्वस्थ समाजासाठी व्यसनमुक्ती हवीच'' अशा घोषणांनी येरमाळा गावाचा परिसर दुमदुमून गेला. ग्रामस्थांच्या प्रचंड उत्साहात आणि सहभागींच्या ऐक्याने हा उपक्रम अत्यंत प्रेरणादायक ठरला. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी व्यसनम ुक्तीबाबत आपले मनोगत व्यक्त केले. सहाय्यक पोलीस निरीक्षक टी आर भालेराव यांनी त्यांच्या प्रभावी शैलीत ''व्यसनमुक्त भारत, सशक्त भारत' हा संदेश देत, युवक, महिला व व्यसन पीडित नागरिकांना व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन केले. त्यांनी नमूद केले की, ''छोट्या-छोट्या सवयींम ध्ये बदल करून आपण व्यसनमुक्त जीवनाकडे वाटचाल करू शकतो आणि अधिक आनंदी, आरोग्यदायी जीवन जगू शकतो.'' कार्यक्रमाचा समारोप करताना येरमाळा पोलीस स्टेशन, ग्रामपंचायत येरमाळा, येडेश्वरी देवस्थान ट्रस्ट, येरमाळा पत्रकार संघ व येडाई व्यसनमुक्ती केंद्राच्या वतीने रॅलीत सहभागी झालेल्या सर्व पोलीस व ग्रामस्थ, व्यसनमुक्ती केंद्राचे कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते आणि युवकांचा विशेष आभार मानण्यात आला. ही रॅली येरमाळा गावासाठी एक प्रेरणादायी उदाहरण ठरले, जे इतर गावांसाठीही दिशादर्शक ठरू शकेल.